
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३७ पुणे, बुधवार, १७ फेब्रुवारी, १९७१ अंक ४

## छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा




सुमारे ३०० हून अधिक रस्ता-वाहतूक व्यावसायिकांना बँकेचे आर्थिक साहाय्य लाभले आहे.

सुमारे एका कोटीच्या घरात!

**तुमच्याही छोट्या-मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.**

तपशीलासाठी आजच चौकशी करा.

## बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

6987

## विमानातील नष्ट झालेल्या मालमत्तेबद्दल नुकसानभरपाई

लाहोरमध्ये नष्ट करण्यात आलेल्या विमानांतील उतारूंची मालमत्ता आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. उतारूंच्या ह्या नुकसानीबद्दल इंडियन एअर लाइन्स कंपनी खास प्रकरण म्हणून काही प्रमाणात नुकसानभरपाई देण्याचा संभव आहे. जबरदस्तीने पळवून नेण्यात आलेल्या विमानातील सामानसुमान, माल अगर टपाल नष्ट झाले तर त्याबद्दल काय व्यवस्था लावावयाची ह्याविषयी सध्याच्या कायद्यात अगर संकेतात काही तरतूद नाही. विमान अपघातात सापडून माल अगर सामान नष्ट झाल्यास कंपनीला दर किलोग्रॅम मागे ८० रुपये द्यावे लागतात. चोरीसारख्या इतर कारणांनी नुकसान झाल्यासही ह्याच दराने नुकसानभरपाई द्यावी लागते. पण विमानच अपघातात नष्ट झाले तर हा नियम लागू नाही. विमाने जबरीने पळवून नेण्याचे प्रकार गेल्या वर्षीच घडू लागले. त्यामुळे ह्या बाबतीत आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे प्रघात अद्याप रूढ झालेले नाहीत. विमानाचा विमा उतरविलेला असतो. लाहोरमध्ये नष्ट झालेले म्हणजे उडविलेले विमान १९६१ साली घेतलेले होते. त्याच्या जागी नवे त्याच जातीचे विमान घेण्यासाठी कंपनीला १ कोटी रुपये मोजावे लागतील. गेल्या काही वर्षांत कंपनीला अशाच प्रकारची ४ विमाने गमवावी लागली आहेत. त्याशिवाय १९६६ साली कारव्हेल जातीची दोन विमानेही कंपनीने गमावली आहेत. पाकिस्तानातील सिलचर ह्या ठिकाणी पडलेल्या विमानाबद्दल रोख नुकसानभरपाई देण्याऐवजी विमा उतरणाऱ्या कंपनीने त्याच जातीचे जुने विमान देऊ केले आहे. त्याची पाहणी करण्यासाठी इंडियन एअर लाइन्सचा एक अधिकारी ब्रिटनला गेला आहे.

---

## पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम

काश्मीरधील हवाई चाच्यांनी भारताचे एक उतारू विमान पळवून लाहोरला जबरीने उतरविले व जाळून टाकले. ह्या गुंडगिरीला उत्तर म्हणून भारताने पाकिस्तानच्या लष्करी व मुलकी विमानांना हिंदच्या प्रदेशावरून उड्डाण करण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे १९६५ साली हिंद-पाकमध्ये झालेल्या युध्दाच्या वेळी पाकिस्तानला जसे विमानाचे मार्ग बदलावे लागले तसेच आताही बदलावे लागले आहेत. डाक्क्याला जाण्यासाठी कराचीहून प्रथम कोलंबोला व तेथून पुढे जावे लागेल. हिंदी प्रदेशावरून भ्रमण करण्याची मुभा होती तेव्हा पाकिस्तानी विमानांना अवघे १,४६४ मैल अंतर तोडावे लागत असे. आता त्यांना जवळजवळ २,९०० मैल उड्डाण करावे लागेल. ह्या मार्गाशिवाय दुसरा मार्ग पाकिस्तानला उपलब्ध नाही. गिलगिट व तिबेटवरून जाण्याचा मार्ग कमी लांबीचा झाला असता; पण ह्या मार्गावर सिक्किमचा प्रदेश येतो. शिवाय तिबेटवरून जाण्यास चीन संमती देण्याचा संभव फारसा नाही. परिणामी, पाकिस्तानी विमानांचा इंधनावरील खर्च बराच वाढणार आहे. पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान ह्यांच्यात अगोदरच तेढ आहे. विमानांनी लांबचा मार्ग स्वीकारल्यावर पाकिस्तानच्या ह्या दोन भागांतील अंतर वाढतच जाण्याचा संभव आहे. सरकारी अधिकारी व इतर प्रवासी ह्यांची जा ये अधिक अनियमित होईल. टपालाची व व्यापाराची तशीच गत होईल. पाकिस्तानच्या विमानांचे वाहतुकीचे दरही वाढवावे लागतील. त्याचा परिणाम होऊन मासे, फळे, औषधे, मसाल्याचे पदार्थ, सुपारी, विड्याची पाने, तंबाखू, चहा, तागाचा माल, इत्यादींच्या किमती वाढू लागतील.

## निवडणुकीने फक्त पोस्ट खात्याला फायदा

लोकसभेच्या निवडणुकांसाठी सर्व सरकारी खात्यांच्या खर्चात वाढ होणार आहे. ह्याला अपवाद म्हणजे पोस्ट व टेलिग्राफ खाते. ह्या खात्याला मात्र २·५ कोटी रुपयांची प्राप्ती होईल असा अंदाज करण्यात आला आहे. निवडणुकीच्या निकालांची माहिती देण्यासाठी ७० शहरांतील टेलिफोन्स १० मार्चपासून एकसारखे खणखणत राहतील आणि सुमारे २,००० टेलिफोन कर्मचारी लोकांना माहिती पुरवत राहतील. मते मोजण्याच्या ठिकाणी खात्याचे लोक हजर राहणार आहेत. त्यांच्या साह्याने दिल्ली, कलकत्ता, मुंबई आणि मद्रास ह्या शहरांतून १०० वर कर्मचारी अगदी ताज्यातली ताजी बातमी देशभर पसरवितील. निरनिराळ्या राज्यांच्या केंद्रांना माहिती दिली जाईल. तेथून ती दिल्लीला पाठविण्यात येईल आणि तेथून खास सोय केलेल्या ७० शहरांकडे धाडण्यात येईल. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे वेळी १५ लाख कॉल्सना उत्तरे देण्यात आली. १९६९ मध्ये ५ राज्यांत मध्यावधी निवडणुका झाल्या. त्यावेळी ८ लाख कॉल्सना उत्तरे देण्यात आली. आताच्या निवडणुकीत १५ ते १६ लाख कॉल्सना उत्तरे द्यावी लागतील असा कयास आहे. एका कॉलला १५ पैसे ह्या हिशेबाने खात्याला २·५ कोटी रुपये मिळतील. निवडणुकीचे निकाल कळविण्यासाठी टेलिफोन्सची खास सेवा चालू ठेवण्यात येणार आहे. त्यावर काही जादा खर्च करावा लागेल, पण तो फार मोठा असणार नाही. पोस्ट खात्याला एरव्ही थोडाबहुत तोटाच येत असतो. म्हणून कार्डांचे दरसुद्धा वाढवावे लागलेले आहेत. म्हणजे खात्याच्या दृष्टीने निवडणूक ही पर्वणीच ठरणार आहे.

---

## इंग्लंडमधील पोस्टाच्या संपाचा परदेशी विद्यार्थ्यांवर परिणाम

इंग्लंडमधील पोस्टाच्या प्रदीर्घ संपामुळे तेथील परदेशीय विद्यार्थ्यांची स्थिती करुणाजनक झाली आहे. कारण, परदेशातून येणाऱ्या मनिऑर्डरी, ग्रँट्स् आणि चेक्स बटवडा न होता पडून आहेत. लंडनमधील वकिलातीत हे विद्यार्थी गर्दी करून तातडीने पैसे मिळण्याची व्यवस्था करण्यासाठी याचना करीत आहेत. पण वकिलाती काहीच करू शकत नाहीत. अशा परिस्थितीत मित्रांच्या कडून कर्जे मिळणेही दुर्घट झाले आहे.

---

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १७ फेब्रुवारी, १९७१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## ग्राहकांच्या संघटनेच्या अभावाचा परिणाम

अमेरिकेतील ग्राहकांच्या संघटना बाजारात येणाऱ्या मालाच्या दर्जाविषयी आणि किंमतीविषयी दक्ष असतात. त्यामुळे तेथील बाजारात कमी प्रतीचा माल व गैरवाजवी किंमती ह्यांची डाळ फार काळ शिजत नाही. औद्योगिकदृष्ट्या अत्यंत प्रगत असलेल्या देशांतील नागरीक ग्राहक ह्या नात्याने संघटित असावेत ह्यात नवल नाही. पण ज्या देशांत औद्योगिक विकास नव्याने आणि तोही काहीसा घाईगर्दीने होत आहे, तेथे ग्राहकांना संघटित होण्यास फारसा अवसर मिळत नाही. एकतर औद्योगिक विकास साधताना अविकसित देशांत तरी चलनवृद्धीचे धोके पत्करावे लागतात. परिणामी, समाजातील काही थरांत पैसा मुबलक होतो आणि मालाच्या किंमती वाढू लागतात. नागरी विभागात हे विशेष आढळून येते. अशा परिस्थितीत कारखानदार बाजारात कमी प्रतीचा माल आणून तो चढत्या किमतीत विकू शकतात. भारतात आज ही परिस्थिती आढळून येते. मग हा माल विजेच्या उपकरणासारखा आधुनिक प्रकारचा असो अगर तिखटाहळदी-सारखा रोज-खपाचा असो. भारतात ग्राहकांची समर्थ संघटना नसल्याने बाजाराच्या ह्या अवस्थेवर नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. त्यातच ह्या बाबतीत काय करायचे ते सरकारने करावे अशी वृत्ती आढळून येते. पण, सरकारलाही असे नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. देशाचा मोठा विस्तार आणि लाखो खेड्यापाड्यांतून विखुरलेली प्रचंड लोकसंख्या ही ह्या बाबतीत अडचणीची ठरतात. अनेक खेड्यांना जाण्यास नीटसे रस्तेसुद्धा नसतात. अशा परिस्थितीत ग्राहकांच्या संघटना उभारण्याखेरीज दुसरा मार्ग परिणामकारक नाही. अर्थात ह्या संघटना कायम स्वरूपाच्या असल्या पाहिजेत.

## गृहिणींच्या संघटनेचा सुपरिणाम

ग्राहकांच्या परिणामकारक संघटना नसल्यामुळे जपानसारख्या प्रगत देशातही काही अंशी भारतासारखीच परिस्थिती आहे. आता मात्र तेथील ग्राहकसंघटना मालाच्या दर्जासंबंधी व किमती-संबंधी डोळ्यात तेल घालून लक्ष देऊ लागल्या आहेत. ह्या प्रकरणात जपानमधील गृहिणींनी चांगले कार्य चालविले आहे. गेल्या महायुद्धानंतर जपानचे औद्योगीकरण द्रुतगतीने झाले. त्यामुळे अनेक प्रकारचा नवनवीन माल बाजारात येऊ लागला. त्याच्या दर्जाकडे नीटसे लक्ष दिले गेले नाही. परिणामी, बाजारात नवीन प्रकारचे संस्कारित डबाबंद अन्नपदार्थ, रामबाण औषधे, खूप वेगाने चालणाऱ्या मोटारी, इत्यादी माल दिसू लागला. जपानच्या औद्योगिक विकासाचा फायदा खरा कोणाला मिळाला असेल तर तो तेथील उद्योगपतींना. त्यांनी मालाच्या विक्रीचा प्रचारही सपाटेबंद केला. ग्राहकांना नाना तऱ्हेची आमिषे दाखविण्यात आली. जाहिरातबाजी इतकी व अशी करण्यात आली की ग्राहकांना मालाच्या दर्जाबद्दल व किमतीबद्दल विचार करण्यास वेळच मिळू दिला गेला नाही. परंतु काही वर्षांनी जपानी ग्राहक सावध होऊ लागला. जपानमधील गृहिणींची एक मध्यवर्ती संघटना आहे. तिने ह्या बाबतीत पुढाकार घेऊन कमी दर्जाचा माल चढ्या किमतीने विकणाऱ्या कारखानदारांवर दडपण आणण्यास प्रारंभ केला. त्याचा परिणाम होऊ लागून घरात नेहमी वापरात असणाऱ्या उपकरणांच्या किमतीत २० टक्के कपात करणे कारखानदारांना भाग पडले. जपानमधील गृहिणीला टेलिव्हिजनचा पडदा, धुण्याचे यंत्र, शीतपेटी आणि इतर विजेची उपकरणे रोजच वापरावी लागतात. अमेरिकेप्रमाणेच जपानी स्त्रियांचाच बाजारपेठावर पगडा बसण्याची चिन्हे दिसतात.

---

## चाळीस लाख रुपयांच्या पेट्रोलची चोरी ?

मध्यपूर्वेतील देश जगात पैदा होणाऱ्या खनिज तेलापैकी फार मोठा हिस्सा पैदा करतात. त्या भागातील देशातून भूमध्य-समुद्रापर्यंत अनेक परदेशी कंपन्यांनी तेल वाहून नेणारे मोठे नळच टाकलेले आहेत. मैलोगणती पसरलेल्या ह्या नळांवर अष्टौप्रहर नजर ठेवणे शक्य नसते. अर्थात् तेलवाहतुकीत थोडा-बहुत धोका असतोच. भारतात तेलाची वाहतूक करणारे नळ गोहत्ती ते सिलगुरीपर्यंत टाकण्यात आलेले आहेत. इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनच्या मालकीच्या ह्या नळामधील ४० लाख रुपये किंम-तीच्या पेट्रोलची पद्धतशीर चोरी दीर्घकाळपर्यंत चालू होती. सेंट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशनतर्फे आता ह्या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. ह्या प्रकरणात कॉर्पोरेशनचे अनेक लोक गुंतलेले असावेत व त्यांत काही बडे अधिकारीही असावेत असा संशय आहे.

---

## कलकत्ता शहरासाठी पिण्याच्या पाण्याची योजना

हिंदमधील अनेक खेड्यांना चांगले शुद्ध पिण्याचे पाणी मिळण्याची कायमची सोय नाही. तथापि, ह्या बाबतीत कलकत्त्यासारखे मोठे शहरही त्यांच्यातच मोडते. ह्या शहराची लोकसंख्या आणखी ३० वर्षांनी म्हणजे इ. स. २००१ मध्ये १ कोटी, ४० लाखांपर्यंत वाढेल असा अंदाज आहे; आणि मग इतक्या मोठ्या लोकसंख्येला पिण्याचे पाणी पुरविण्याचा प्रश्न पराकोटीचा अवघड होऊन बसेल. जागतिक आरोग्य-संघटनेने शहराला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची एक योजना आपल्या मासिकपत्रकात प्रसिद्ध केली आहे. ती पुरी करण्यासाठी ५५.५ कोटी डॉलर्स अथवा ३४१.२५ कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्याच योजनेत शहरातील सांडपाण्याचा निचरा करण्याचीही व्यवस्था रेखाटण्यात आली आहे. कलकत्ता शहरावर कायम स्वरूपाच्या कॉलऱ्याची सावली पडलेली आहे. आता ह्या परिस्थितीची परमावधी होऊ घातली आहे. संघटनेच्या योजनेची भारताच्या आगामी पंचवार्षिक योजनांशी सांगड घालण्यात आलेली आहे. योजना अमलात आणण्याची आर्थिक बाजू सोडून दिली तरी ती प्रत्यक्षात उतरण्यासाठी गंगेवर बांधण्यात येत असलेले फराक्का धरण योग्य वेळी पूर्ण होणे अगत्याचे आहे. हे धरण १९७१-७२ मध्ये पूर्ण होईल असा अंदाज आहे. पण, काही कारणाने ते पुरे झाले नाही तर कलकत्ता शहरावरच नव्हे तर सर्व मानव जातीवर भयंकर आपत्ती कोसळल्याशिवाय राहणार नाही, असा इषारा १९६७ साली आंतरराष्ट्रीय नियोजन ह्या विषयासंबंधी कलकत्ता येथे भरविलेल्या परिसंवादात देण्यात आलेला आहे.

---

## भारत-पाकिस्तान संबंध बिघडण्याचे कारण अमेरिका

भारताची फाळणी झाल्यापासून उभयता देशांचे परस्पर संबंध मित्रत्वाच्या नात्याचे कधीच राहिले नाहीत. ह्या संबंधाची ऐतिहासिक कारणपरंपरा विविध रीतीने करण्यात येते. पण १९४७ साली पाकिस्तान अस्तित्वात आल्यापासून ह्या राष्ट्रांचे संबंध दुरावण्यास अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण कारणीभूत झाले आहे अशी उघड टीका भारतामधील अमेरिकेचे माजी वकील चेस्टर बौल्स ह्यांनी केली आहे. ह्यापूर्वीही त्यांनी पाकिस्तानला अमेरिकेने दिलेल्या शस्त्रास्त्रांच्या मदतीबद्दल परखड टीका केली आहे. तथापि, अमेरिका परदेशांना मदत देत असलेल्या लष्करी मदतीवर नजर ठेवणाऱ्या अमेरिकन काँग्रेसच्या कमिटीपुढे त्यांनी दिलेली साक्ष विशेष महत्त्वाची आहे. सर ओलॅफ कॅरे नांवाच्या एका ब्रिटिश सनदी नोकराने आग्नेय आशिया आणि मध्यपूर्व आशिया ह्या भागांतील ब्रिटनच्या हितसंबंधांविषयी एक पुस्तक लिहिलेले आहे. हे पुस्तक १९५० साली अमेरिकन सरकारच्या नजरेस आले आणि त्याच्या आधारावर अमेरिकेने आपले परराष्ट्रीय धोरण आखले असा आरोप मि. बौल्स ह्यांनी केला आहे. पुस्तकांतील विचारसरणीप्रमाणे भारत स्वतंत्र झाल्यावर हिंदी लष्कर ब्रिटिशांच्या दृष्टीने निरुपयोगी झाले. ह्या लष्कराची जागा पाकिस्तानचे लष्कर घेईल अशी अमेरिकेची समजूत होती. परंतु पुढे पाकिस्तानने कम्युनिस्ट राष्ट्रांविरुद्ध असणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांच्या आघाडीत भागच घेतला नाही आणि तरीसुद्धा अमेरिकेने पाकिस्तानमधील पेशावरच्या तळाच्या मोबदल्यात त्या देशाला शस्त्रास्त्रे पुरविली. ह्या पुरवठ्याच्या बाबतीत मि. बौल्स ह्यांनी आयसेनहोअर, केनेडी आणि निक्सन ह्या सर्वच अध्यक्षांना दोष दिला आहे आणि शस्त्रपुरवठा मूर्खपणाचा आहे असे बजावले आहे.

---

## खुल्या विद्यापीठाची अभिनव सूचना

विद्यापीठ अनुदान मंडळाचे अध्यक्ष डॉ. डी. एस्. कोठारी ह्यांनी हैदराबाद येथे एका नव्या कॉलेजच्या पायाभरणीच्या समारंभप्रसंगी भाषण करताना एक अभिनव आणि मुलखावेगळी सूचना केली आहे. वयस्कर माणसे विद्यापीठाच्या परिक्षांना बसून उत्तीर्ण झाल्याच्या वार्ता परिक्षांच्या मोसमात नेहमीच येतात. पण ह्या प्रौढांना विद्यापीठात प्रवेश करण्यापूर्वी अगर बाहेरून बसण्यासाठीही काही किमान अभ्यासक्रम पुरा केल्याचा दाखला द्यावा लागतो. ज्यांना विद्येची खरी आस्था आहे पण काही कारणांनी ज्यांना विद्याभ्यास करता येणे शक्य झाले नाही त्यांना ही अडचण वाटत असते. अशा लोकांना त्यांच्या आवडीचे शिक्षण घेता यावे म्हणून एक खुले विद्यापीठ असावे अशी सूचना डॉ. कोठारी ह्यांनी केली आहे. ते म्हणतात की २५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या कोणाही प्रौढाला शैक्षणिक पात्रतेचा रूढ शिक्का नसतानाही विद्यापीठात प्रवेश देण्यात यावा. ज्यांना ज्यांना उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांना त्यांना ते घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, ह्या विचाराचा प्रसार आता जगभर झालेला आहे. ब्रिटन हा देश शिक्षणविषयक धोरणाच्या बाबतीत चाकोरी सोडून जाण्यास उत्सुक नसतो. पूर्वापार चालत आलेली पद्धत बदलण्यास तेथे नेहमीच विरोध होत असतो. परंतु परंपरेच्या रक्षणासाठी नेहमी सिद्ध असलेल्या ह्या देशातही राजेसाहेबांनी एक खास फर्मान काढून खुल्या विद्यापीठाची स्थापना केली आहे आणि ह्या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी २५ हजार विद्यार्थ्यांनी आपली नावेही नोंदविली आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेशापूर्वी त्यांना आस्था असलेल्या विषयाचे नाव आणि त्याचा व्यवसाय ह्याची माहिती द्यावी लागते.

---

**सावकारांचे व्याजाचे दर वाढवून द्या—** बॉंबे मनीलेंडर्स ॲक्टने कमाल व्याजाचे दर ठरवून दिले आहेत, ते वाढवून मिळावेत, अशी मागणी शिकारपुरी श्रॉफ्स असोसिएशन, मुंबई, ह्यांनी सहकारमंत्री श्री. मोहिते ह्यांचेकडे केली आहे.

## मुंबईकरांचे आवडते खरेदी-स्थान

# सहकारी भांडार

(लेखक : बॅ. का. शं. धारिया, अध्यक्ष, सहकारी भांडार, मुंबई)

मुंबई शहरात सहकारी भांडार, अपना बजार व सहकारी बझार ह्या तीन सहकारी संस्थांची पाच सकल वस्तू भांडार ( डिपार्टमेंट स्टोअर्स ) आहेत. ह्या सकल वस्तू भांडारामुळे काळ्या बाजारावर व भरमसाट भाववाढीवर काही प्रमाणात नियंत्रण आले आहे व ह्या सर्वांची वार्षिक विक्री ३॥ ते ४ कोटी रुपये आहे. २६ जानेवारी ७१ रोजी मुंबईतील पहिल्या सकल वस्तू भांडारास चार वर्षे पुरी झाली आहेत. त्यानिमित्त सहकारी भांडाराचे कार्यासंबंधी व अडचणीसंबंधी माहिती 'सहकारी महाराष्ट्रा'वरून येथे उद्धृत केली आहे.

कुलाबा सेंट्रल को-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स स्टोअर्सची स्थापना सप्टेंबर, १९६६ मध्ये मुंबई शहरात सकल वस्तू भांडार स्थापन करण्याचे दृष्टीने करण्यात आली व १९ सप्टेंबर, १९६६ रोजी महाराष्ट्र सरकारने स्टोअर्सकरिता मॅनेजिंग कमेटीची नियुक्ती केली व मला चेअरमन म्हणून नेमले. फर्निचर, नोकरवर्ग व माल ह्या सर्वांची तयारी करण्यास ४ महिने लागेल व २६ जानेवारी रोजी ना. वसंतराव नाईक, मुख्यमंत्री ह्यांचे शुभहस्ते सकल वस्तू भांडाराचे उद्घाटन झाले व ह्या भांडारास 'सहकारी भांडार' हे नाव देण्यात आले. मुंबई शहरातील हे पहिले सकल वस्तू भांडार असून फारच थोड्या काळात लोकप्रिय झाले.

मॅजेस्टिक हॉटेलचा तळमजला व तळघर हा सरकारने खाली करून सहकारी भांडाराकरिता दिला. १३,६६८ चौरस फूट जागा दुकानाकरिता उपयोगात आणली आहे. २,४९६ चौरस फूट जागा कचेऱ्यांकरिता वापरली जाते. सहकारी भांडारात गिऱ्हाइकास लागणारा सर्व माल एकत्र मिळत असल्यामुळे निरनिराळ्या दुकानांतून खरेदी करण्यापेक्षा एकाच जागी सर्व प्रकारची खरेदी करण्याची सोय झाल्यामुळे गिऱ्हाइकांस ते एक आकर्षण वाटू लागले. (१) स्टेशनरी (२) चामड्याच्या बॅगा वगैरे माल (३) कॉस्मेटिक्स (४) कस्टमनी जप्त केलेला माल (५) ट्रान्झिस्टर (६) लॉटरी तिकिटे (७) काचसामान व कटलरी (८) प्लास्टिकचा सर्व तऱ्हेचा माल (९) इलेक्ट्रिक सामान (१०) स्टेनलेस व ॲल्युमिनियमची भांडी (११) घड्याळे (१२) सर्व तऱ्हेचे कापड व पातळे (१३) रेडिमेड माल (१४) पादत्राणे (१५) सरकारी बेकन व पोल्ट्री फॅक्टरीचे डुकरांचे मांस व कोंबड्यांचे मांस (१६) किराणा माल व खाण्याच्या सर्व वस्तू (१७) औषधे (१८) भाजी व फळे. गिऱ्हाइकांचे सोयीकरता कॅन्टीन पण जून १९६९ पासून उघडले आहे व माफक दरामुळे जागा अपुरी पडू लागली आहे. तसेच हंगामाप्रमाणे अगर ठराविक कंपनीचा अगर प्रकारचा माल विकण्याकरिता एक मध्यवर्ती ठिकाण राखून ठेवले आहे व हा विभाग मालाच्या नाविन्यामुळे व आकर्षणामुळे फारच लोकप्रिय झाला आहे. जून १९६९ मध्ये बीच कँडी येथे सहकारी भांडाराची एक शाखा उघडण्यात आली आहे व तेथे किराणा माल व इतर खाद्य पदार्थ व कॉस्मेटिक ठेवण्यात आले आहे. जागा १,२०० चौरस फूट असून एवढ्या लहान जागेत जून, १९७० मध्ये २ लाख, २२ हजार रुपयांची विक्री झाली. एवढ्या लहान जागेत एवढी मासिक विक्री अन्यत्र पाहावयास मिळणार नाही.

सहकारी भांडाराचे सभासद ७,५०० असून शेअर भांडवल ३ लाख, १९ हजार रु. आहे शिवाय सरकारने ११ लाख रुपयांचे शेअर्स घेतले आहेत. तसेच ७ लाख रुपये फर्निचर व इतर सामानाकरिता ५॥ लाख रुपये कर्ज व १॥। लाख मदत दिली आहे. सहकारी भांडाराला बँकेकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था सरकारने केली असली तरी सहकारी भांडार कर्ज न घेता आपला कारभार करीत असून सध्या भांडाराचे २ लाख रुपये बँकेत मुदत ठेवी व सेव्हिंग बँकेमध्ये आहेत. कर्जाशिवाय एवढा मोठा व्यवहार करणारी सहकारी संस्था मिळणे कठीण आहे.

सेवक वर्गाची संख्या २६८ असून अंदाजे ६० हजार रुपये मासिक पगार खर्च आहे व ह्याशिवाय पहिल्या वर्षापासून नोकरवर्गास बोनस दिला गेला आहे. सर्व सकल वस्तू भांडारात आमचे पगारमान जास्त आहे.

जुलै ६९ ते जून ३० ह्या वर्षात सहकारी भांडाराची एकूण विक्री १७० लक्ष रु.ची होती. व ह्या विक्रीवरून सहकारी भांडाराच्या उलाढालीची कल्पना येऊ शकेल. सहकारी भांडार हे किरकोळ विक्री करीत असल्यामुळे व महाराष्ट्रात खाजगी अगर सहकारी क्षेत्रात एवढी किरकोळ विक्री करणारे दुकान नसल्यामुळे सहकारी भांडाराच्या कार्याची कल्पना येऊ शकते.

---

### धातु निदर्शकांची त्वरित आयात !

काश्मीरमधील कटवाल्यांनी पाकिस्तानच्या साह्याने एक भारतीय विमान लाहोरला जबरदस्तीने पळवून नेले आणि जाळून टाकले. विमानातून प्रवास करणाराजवळ धातूचा बनविलेला काही जिन्नस असेल तर तो हुडकून काढण्यासाठी परदेशातील मोठ्या विमानतळावर मॅग्नेटोमीटर म्हणून एक यंत्र वापरले जाते पश्चिम आशियात व दक्षिण अमेरिकेत विमाने जबरीने पळवून नेण्याचे प्रकार घडल्यानंतर ह्या यंत्रांना जगभर फार मागणी आली. भारत सरकारने अशा प्रकारची चार यंत्रे अमेरिकेकडून मागविली होती. नवी दिल्ली, मद्रास, कलकत्ता आणि मुंबई ह्या चार विमानतळावर ती बसविण्यात येणार होती. आता आणखीही काही यंत्रे मागविण्यात येणार आहेत. एका यंत्राला ८,५०० रुपये पडतात. परंतु एखाद्याने प्लॅस्टिकचे बनविलेले पिस्तूल नेले तर तो यंत्राला फसवू शकेल. यंत्र अधिक संवेदनशील करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

---

### डोळ्यांत बसविण्याच्या भिंगांची निर्मिती

माणसाच्या सर्व ज्ञानेंद्रियांत डोळ्याला असाधारण महत्त्व आहे. वयोमानाप्रमाणे डोळ्यांची कार्यक्षमता कमी होत जात असते. त्या वेळी नाकावर आरूढ होऊन कानांच्या आधाराने स्थिर राहणारा चष्मा लावावा लागतो. काहींच्या मते चष्म्याने चेहऱ्याला भारदस्तपणाचा लाभ होतो. पण ह्या मताशी विवाहाच्या बाजारात उतरलेल्या तरुणी सहमत होणे कठीण आहे. कारण, चष्मावाली मुलगी नाकारणारे तरुण बरेच असतात. त्यांना स्वतःला मात्र तो असलेला खपतो. म्हणजे, तरुणींच्या बाबतीत चष्मा ही दृष्टिदोषाची निशाणीच होऊन बसते. अलीकडे नेहमीच्या चष्म्याऐवजी डोळ्यातच भिंगे बसविण्याची युक्ती निघालेली आहे परंतु अशी डोळ्यात बसविण्याची भिंगे फार महाग म्हणजे एका जोडीस ३०० ते ४०० रुपये इतकी महाग असतात. साहजिकच ही सोय सामान्य लोकांना परवडत नाही. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ह्या संघटनेने डोळ्यांत बसविण्याच्या काचा बनविण्याचे यंत्र मिळविले आहे. ह्या काचा प्लॅस्टिकच्या चकत्यापासून बनविण्यात येतात. चकत्या मात्र परदेशांतून आयात कराव्या लागतात. काचा संघटनेमार्फत बनविण्यात येऊ लागण्यास सुमारे ६ महिन्यांचा अवधी लागेल आणि मग त्यांच्या जोडीची किंमत सुमारे १०० रुपयांपर्यंत खाली येईल. तथापि ह्या काचा डोळ्यांत बसविण्याचे काम कौशल्याचे आहे. काचा नीट बसविल्या गेल्या नाहीत तर डोळ्यांत फोड येणे अगर त्यांना जंतूंची बाधा होण्याचा संभव असतो. अयोग्य तऱ्हेने बसविल्या गेलेल्या काचा नीट जागच्या जागी बसविण्याचे यंत्रही संघटनेने मिळविले आहे.

---

### काराकोरम हायवे

पाकिस्तान आणि चीन ह्यांचेमध्ये दळणवळण करू शकणारा ४०० मैल लांबीचा रस्ता नुकताच वाहतुकीस खुला करण्यात आला. त्याचे नाव काराकोरम हायवे असं ठेवण्यात आले आहे. चीनने हा रस्ता तयार करण्यास मदत केली आहे.

---


लहानमोठे कारखानदार व व्यापारी यांना मालाची जाहिरात व विक्री करण्याची सुसंधी

**८ वे पुणे औद्योगिक प्रदर्शन**

**दिनांक १८ फेब्रुवारी ते दिनांक १४ मार्च १९७१**

स्टॉल्स व शोकेसेसची नोंदणी चालू आहे.

आजच समक्ष भेटून आपल्या स्टॉल किंवा शोकेसेसची निवड करा.

महात्मा फुले वस्तु-संग्रहालय, घोले रस्ता, पुणे.


**तिघांपैकी एक मतदार ३० वर्षांपेक्षा लहान**—येत्या निवडणुकीत भाग घणाऱ्या मतदारांपैकी एक तृतीयांश मतदार ३० वर्षांपेक्षा कमी वयाचे असतील.

**हॉलिवुडचा झगझगाट कमी झाला**—अमेरिकेतील चित्रपट नगरीला–हॉलिवुडला–अवकळा प्राप्त झाली आहे. मोठाले स्टुडिओ बंद पडले आहेत. निम्मे लोक बेकार झाले आहेत. २५ वर्षांपूर्वी अमेरिकेत ८ कोटी लोक दर आठवड्यास चित्रपट पाहात असत. आता ही संख्या २ कोटींवर आली आहे. टेलिव्हिजनची वाढती लोकप्रियता हे त्याचे कारण आहे.

**सेव्हिंग्ज खातेदारांचा विमा**—बँकांतील सेव्हिंग्ज खातेदाराच्या मृत्यूनंतर, खातेदार ४० वर्षांच्या आत असल्यास त्याच्या ठेवीच्या दुप्पट रक्कम मृत्यूनंतर दिली जाईल. ४१ ते ४९ वर्षे वयाच्या ठेवीदारांचे बाबतीत ही रक्कम ठेवीच्या एवढीच असेल. लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ह्या प्रकारची अभिनव विमा योजना सुरू करणार आहे.

**सहकारी संस्थांच्या ऑडिटची छाननी**—महाराष्ट्रातील महत्त्वाच्या सहकारी संस्थांच्या ऑडिटची छाननी करण्यासाठी राज्य पातळीवर चार सभासदांची एक कमिटी नेमण्यात आली आहे. श्री. पां. वा. गाडगीळ ( चेअरमन ), श्री. रत्नाप्पा कुंभार ( इचलकरंजी ), श्री. शामराव कदम ( नांदेड ) आणि जॉईंट रजिस्ट्रार ( ऑडिट ), सेक्रेटरी, असे ते चार सभासद आहेत.

**नर्सिंगचा डिग्री शिक्षणक्रम**—पुणे येथील आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेज चार वर्षांचा नर्सिंगचा डिग्री कोर्स सुरू करीत आहे. अविवाहित, घटस्फोटित, कायद्याने विभक्त झालेल्या किंवा पाशरहित विधवा स्त्रिया, त्या १७ ते २९ वर्षे वयाच्या असल्यास, प्रवेशास पात्र असतील.

**सर्वांत मोठा मतदारसंघ**—राजस्थानातील बारमेर मतदारसंघ हा देशातील सर्वांत मोठा लोकसभा मतदारसंघ आहे. ह्या मतदारसंघाचा आकार केरळ राज्याच्या आकाराच्या दुपटीपेक्षाही अधिक असून लोकसंख्या मात्र फार विरळ आहे. मतदारसंघाचे क्षेत्र २६ हजार चौरस मैलांवर पसरलेले आहे. त्याची ६४० किलोमीटर सरहद्द पाकिस्तानला लागून आहे. मतदारांची एकूण संख्या ५ लाख, ६७ हजारांपेक्षा थोडी अधिक आहे.

**माजी जनरल निवडणुकीस उभा**—१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी हिंदी लष्कराचे नेतृत्व करणारे जनरल हरबक्षसिंग लोकसभेच्या निवडणुकीसाठी संग्रूर मतदारसंघातून उभे राहिले आहेत. त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज भरला असला तरी त्यांना काही विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळण्याचा संभव आहे.

**पूरग्रस्त पाकिस्तान्यांसाठी पोपची मदत**—पॉप पोलने मदतीसाठी केलेल्या आवाहनानुसार १० कोटी रुपये वर्गणी जमली आहे.

# आमदार श्री. साहेबराव माधवराव सातकर, अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, पुणे



श्री. साहेबराव माधवराव सातकर यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील खेड (राजगुरुनगर) येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण सन १९३८ मध्ये पूर्ण झाले. वयाच्या १८ व्या वर्षीच प्रापंचिक जबाबदारी अंगावर पडल्याने सदर जबाबदारी सांभाळून त्यांनी सन १९३८ ते १९४२ या काळात व्हॉलंटरी शिक्षक तदनंतर सन १९४३ ते १९४७ या काळात शेतकी खात्यात कनिष्ट शेती अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. खेड येथील त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सार्वजनिक जीवनात आणले व खेड ग्रामपंचायतीचे ते सरपंच झाले. गावामध्ये विविध योजना त्यांनी राबविल्या. सन १९४८-४९ मध्ये तालुक्यातील सहकारी चळवळीच्या काही कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून त्यांनी खेडच्या को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे सभासदत्व स्वीकारले व अशा रीतीने त्यांचा सहकारी चळवळीत प्रवेश झाला व त्यांचा तालुका व जिल्हा पातळीवरील इतर संस्थांशी निकटचा संबंध आला. त्यांपैकी खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे ते बरेच वर्षे अध्यक्ष होते. खेड तालुका सहकारी ऑईल मिल, खेड तालुका सहकारी देखरेख संघ, पुणे जिल्हा सहकारी बोर्ड, पुणे जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक लि., या संस्थांचे अध्यक्षपद ते भूषवीत आहेत व महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे ते उपाध्यक्ष आहेत.

पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळाचे त्यांनी दोन वर्षे मानद सचिव व दोन वर्षे अध्यक्षपद विभूषित केले होते. पुणे जिल्हा परिषदेच्या सहकार व बांधकाम समितीचे चेअरमन असताना त्यांनी विविध विकासाच्या योजना पुणे जिल्ह्यात राबविल्या आहेत व भारताच्या पंतप्रधान व समाजवादी समाज रजनेच्या पुरस्कर्त्या श्रीमती इंदिराजी गांधी यांनी त्यांचे तालुक्यास भेट देऊन त्यांना धन्यवाद दिले आहेत.

पुणे जिल्हा काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष म्हणून ते काम करीत असून पुणे जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे प्रणेते म्हणून ते सर्वत्र ओळखले जातात. स्वतःच्या कार्याच्या व निष्ठेच्या जोरावर दिवसेंदिवस त्यांचे कार्याचा व्याप वाढत आहे.

सतत आनंदी व हसतमुखाने सर्वांचे स्वागत करून संकटावर मात करणारे तडफदार व निःस्पृह नेते म्हणून आमदार सातकर साहेब यांच्याकडे पुणे जिल्ह्याची जनता पाहात आहे.

---

**टी-डब्ल्यू ए ला ५१ कोटी रु. तोटा** — ट्रॅन्स वर्ल्ड एअरलाइन्स ह्या अमेरिकन विमान वाहतूक कंपनीला १९७० मध्ये ५१ कोटी रु. तोटा झाला. १९६९ मध्ये १६ कोटी रु. नफा झाला होता. वाहतुकीचा धंदा मंदीत आहे, त्याच वेळी अत्यंत महाग जम्बो विमाने वापरण्यात येणार आहेत. त्यासाठी लागणाऱ्या पैशामुळे निर्माण होणाऱ्या डोकेदुखीस कंपनीला तोंड द्यावे लागणार आहे.

## कलकत्ता शहरासाठी भुयारी रेल्वेमार्ग

कलकत्ता शहरातील वाहतुकीचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी भुयारी रेल्वेमार्ग बांधण्याचा विचार चालू आहे. ह्या कामासंबंधीचा प्राथमिक अहवाल रशिअन एंजिनिअर्सनी सादर केला आहे. रेल्वेचे बांधकाम करण्यासाठी कलकत्ता शहरातील एक स्थानिक कंपनी योग्य असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. गेल्या वर्षी हिंदी इंजिनिअर्सच्या एका कंपनीने भुयारी रेल्वेच्या योजनेसंबंधी आपला अहवाल सरकारला सादर केला होता. ह्या कंपनीने केलेल्या शिफारसी आणि रशिअन इंजिनिअर्सनी केलेल्या शिफारसी ह्यांच्यात बरेच साम्य आहे. भुयारी रेल्वेचा हा मार्ग उत्तरेस डमडमपासून सुरू होऊन दक्षिणेस टॉलिगंज येथे संपेल. त्याची लांबी १६.५ किलोमीटर होईल. इतके अंतर तोडण्यास रेल्वेला अर्धा तास लागेल. वाटेत १७ स्टेशन्स असतील.

---

## खेळांचे सामान तयार करण्याचा धंदा

खेळांचे सामान निर्यात करणाऱ्या देशांत भारत हा एक देश आहे. दरसाल सुमारे १.३ कोटी रुपये किंमतीचे खेळांचे सामान देशातून निर्यात करण्यात येते. निर्यात वाढविण्यासाठी सरकारने बरीच मदत दिलेली आहे. तरी सुद्धा सामान तयार करणाऱ्या कारखान्यांपुढे काही अडचणी आहेत. त्या दूर करण्यात आल्या तर निर्यात अधिक वाढविता येण्यासारखी आहे. सामान तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल अलीकडे योग्य किंमतीत मिळेनासा झाला आहे. कच्च्या मालाच्या वाढत्या किंमतीमुळे निर्यात मालाच्या किंमतीही वाढल्या आहेत. त्यामुळे परदेशाच्या बाजारपेठांतील स्पर्धेला तोंड देणे कठीण जात आहे. भारताशिवाय चीन, जपान, फोर्मोसा व पाकिस्तान हेही देश खेळांच्या सामानाची निर्यात करीत असतात. भारतात सामान तयार करणारे सुमारे ५०० कारखाने आहेत; ते सर्व छोटे आहेत.

---

### ग्रामीण भागात नवे बडे भांडवलशहा

दक्षिण मुंबई मतदार संघातून लोकसभेची निवडणूक लढवीत असलेल्या श्री. नवल टाटा ह्यांनी मुंबई येथे कॉमर्स ग्रॅज्युएटस् असोसिएशनपुढे केलेले भाषण चिंतनीय म्हणावे लागेल. निवडणुकीच्या हंगामात कानावर आदळणाऱ्या इतर भाषणांपेक्षा त्याचा आशय वस्तुस्थितिनिदर्शक तर आहेच; पण ते समतोल आणि समंजसही आहे. श्री. टाटा म्हणाले, की एका प्रकारच्या भांडवलशहाचे उच्चाटन करण्यात येत असतानाच ग्रामीण भागांत बडे शेतकरी भांडवलशहा निर्माण करण्यात येत आहेत. राजकीय कारणासाठी शेतीच्या व्यवसायावर कर बसविण्यात येत नाही. वास्तविक करांचा भार औद्योगिक व शेती विभाग ह्या दोघांनीही पेलण्यास हवा. ग्रामीण भागांत काम करणाऱ्या शेतमजुराला कोठलेही संरक्षण नाही. इतकेच काय पण त्यांना किमान वेतन कायदासुद्धा लागू झालेला नाही. कामगार चळवळीत काम करणाऱ्या पुढाऱ्यांनी शहरातील उद्योगपतींवर खार खाण्यात समाधान मानता कामा नये. त्यांनी खेडेगावांत जाऊन असंघटित शेतमजुरांना संघटित करावे. मालकवर्गाशी सामुदायिक करार करता यावे म्हणून समर्थ अशा कामगार चळवळीची आवश्यकता जरूर आहे. परंतु त्यासाठी असंघटित कामगारांनाही तोंत आणले पाहिजे. सार्वजनिक मालकीच्या विभागाविषयी शत्रुत्वाची भावना ठेवण्याचे कारण नाही. त्याचीही आवश्यकता आहेच. ह्या विभागाने अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी लागणारा भक्कम पाया घातलेला आहे. सहकारी चळवळींचे उद्देश सफल होत नाहीत असे दिसू लागले आहे. कारण ह्या चळवळींतील राजकारणी पुढारी मते मिळविण्याची एक युक्ती म्हणून तिचा वापर करीत आहेत.

---

### अनामत रकमांच्या जप्तीने २५ लाखांचे उत्पन्न

पाकिस्तानात राष्ट्रीय विधानसभा आणि प्रांतिक विधानसभा ह्यांच्या निवडणुका झाल्या. निवडणुका म्हटल्या म्हणजे मोठ्या प्रमाणावर खर्च हा आलाच. पण, पाकिस्तानच्या लष्करी राजवटीला ह्या निवडणुकांच्या द्वारे २५ लाख रुपयांचे उत्पन्न झाले. निवडणुकीला उभ्या राहणाऱ्या ज्या उमेदवारांना एकूण मतदानापैकी १० टक्क्यांपेक्षाही कमी मते मिळाली त्यांच्या अनामत रकमा जप्त करण्यात आल्या. कराचीमधील मॉर्निंग न्यूज ह्या वृत्तपत्रात सरकारी गोटाचा हवाला देऊन वरील माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. ह्या माहितीप्रमाणे पूर्व पाकिस्तानात प्रांतिक विधानसभेच्या निवडणुकीसाठी उभ्या राहिलेल्या व पराभूत झालेल्या उमेदवारांकडून सर्वांत अधिक अनामत रक्कम जप्त करण्यात आली. त्यानंतर पंजाब व सिंध प्रांतातील पडलेल्या उमेदवारांकडून भरण्यात आलेल्या व जप्त झालेल्या रकमेचा अनुक्रम लागतो. जप्त करण्यात आलेल्या एकूण २५ लाखांपेक्षा अधिक रकमेपैकी १२ लाख रुपयांपेक्षाही अधिक रक्कम पूर्व पाकिस्तानातील उमेदवारांनी गमावली. उरलेली १३ लाख रुपयांची रक्कम पश्चिम पाकिस्तानातील पडेल उमेदवारांनी गमावली. पक्षनिहाय विचार केला तर असे दिसते की माजी अध्यक्ष अयूबखान ह्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तान मुस्लिम लीगमधील गटाने सर्वांत अधिक रक्कम गमावली. त्याच्या खालोखाल जमात-इ-इस्लामी ह्या पक्षाने अनामत रक्कम गमावली. अवामी लीगने पश्चिम पाकिस्तानात उभ्या केलेल्या सर्व उमेदवारांना आपल्या अनामत रकमांवर पाणी सोडावे लागले.

---

### विमान उड्डाणाच्या बंदीचा परिणाम

हिंदच्या प्रदेशावरून उड्डाण करण्यास बंदी घातल्याने पाकिस्तानच्या विमानांना दरमहा ३३ लाख रुपयांचे अधिक जळण वापरावे लागेल. कारण, त्यांना भारताला वळसा घालून जावे लागेल, त्याशिवाय भ्रमणाचा मार्ग लांबल्यामुळे पाकिस्तानी विमानांची झीज अधिक वेगाने होत राहील, ती वेगळीच. पूर्व भारतामधील विमानवाहतूक पूर्वीप्रमाणेच चालू ठेवण्याचे ठरविण्यात आले तर भारतालाही जळणासाठी दरमहा ७ लाख रुपये अधिक खर्चावे लागतील. इंडिअन एअर लाइन्स कंपनीने गोहाटी येथील विमानतळावर काही विमाने ठेवून पूर्व पाकिस्तानावरून विमाने न नेण्याची सोय केली आहे. त्यामुळे जळणावर होणाऱ्या खर्चापैकी निम्म्या खर्चात बचत होऊ शकेल. तथापि काही मार्ग बंद होण्याचीही शक्यता आहे.

---

### निवडणुकीच्या खटाटोपाचा तपशील

लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीसाठी सर्व देशभर ३ लाख, ४२ हजार, ९८० मतदान केंद्रे उभारली जाणार आहेत. गेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी ठेवलेल्या मतदान केंद्रांपेक्षा ही संख्या ७५, ४२५ ने जास्त आहे. १९६७ मधील निवडणुकीच्या वेळी असलेल्या मतदारांपेक्षा ह्या वेळची मतदारांची संख्या २·५ कोटींनी अधिक आहे. ह्या वेळी मतदारांची संख्या २७·५ कोटीच्या घरात आहे. मतदानाच्या दिवशी मतदानासाठी काम करणाऱ्यांची संख्या १० लाखांपेक्षा अधिक असेल. गेल्या निवडणुकीच्या वेळी त्यांची संख्या ९ लाख, ६० हजार होती. मतदानाच्या पेट्यांची संख्या १० लाखांइतकी असेल. मतदान-पत्रिका छापण्यासाठी ८६२ टन कागद वापरण्यात येईल. गेल्या निवडणुकीच्या वेळी लोकसभा व राज्यांच्या विधानसभा ह्यांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या होत्या. त्या वेळी १,०८८ टन कागद लागला होता.

---

### श्री. आ. रा. भट ह्यांना 'पद्मश्री'

संपादक 'अर्थ' ह्यांस—

श्री. आ. रा. भट यांना 'पद्मश्री' मिळाल्याचे निमित्ताने लिहिलेले "अर्थ"तील आपले स्फुट मनोज्ञ वाटले. त्यांच्या कार्याचे इतके मार्मिक रसग्रहण इतर कोणी केल्याचे दिसत नाही.

ओगलेवाडी, ६–२–१९७१ शं. ज. जोशी.

## किर्लोस्कर ट्रॅक्टर्सचा नाशिक येथील कारखाना

किर्लोस्कर ट्रॅक्टर्स लि. च्या नाशिक येथील नियोजित कारखान्याचे भूमिपूजन श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांचे हस्ते झाले. हा कारखाना १० कोटी रु. भांडवलाचा असून प्रत्यक्ष उत्पादन १९७३ अखेर सुरू होईल. एअर कूल्ड, फोर स्ट्रोक डायरेक्ट इंजेक्शन इंजिनाचे अग्रेसर जर्मन कारखानदार क्लॉकनर – हमबोल्डड्यूट्झ, ह्यांचेशी किर्लोस्कर कंपनीने कोलॅबोरेशनचा करार केला आहे. ह्या जर्मन कारखानदार फर्मचे असेच अल्जेरिया, जपान, दक्षिण आफ्रिका, अर्जेंटिना, इजिप्त, अमेरिका, इत्यादी देशांत कोलॅबोरेशनचे करार आहेत. किर्लोस्कर ट्रॅक्टर्स लि. प्रारंभी एकूण ६५% भाग स्वतः बनवील; तीन वर्षांत हे प्रमाण ९०% वर जाईल. ह्या ट्रॅक्टर्सच्या वापरास येथील जमीन सोईची आहे किंवा नाही, ह्याची आधीच पाहणी करण्यात आली होती. लहान शेतकऱ्यांनाही हा ट्रॅक्टर विकत घेणे परवडेल आणि ट्रॅक्टर्सच्या निर्गतीसही भरपूर वाव आहे. सर्व माहिती कॉम्प्युटरमध्ये घालून कॉम्प्युटरने सांगितलेल्या जागी म्हणजे नाशिक येथे कारखाना उभारण्यात येत आहे. मेजर जनरल ए. एस. नरवणे (सेवानिवृत्त) हे कारखान्याचे चीफ एक्झिक्यूटिव्ह आहेत.

———

### " ४–४० आठवडा "

अमेरिकेतील ६० कंपन्यांत आठवड्यातील सातांपैकी चार दिवस काम चालते आणि तीन दिवस सुट्टी असते १,५३,००० कामगार असलेल्या क्राइसलर कॉर्पोरेशनने आता युनायटेड ऑटो वर्कर्सच्या प्रतिनिधींशी बोलणी सुरू करून चार दिवसांचा आठवडा सुरू करण्याची शक्यता अजमावण्यास प्रारंभ केला आहे. हा आठवड्याला " ४–४० आठवडा " असे म्हणण्यात येते. त्याचा अर्थ, कामगारांना चार दिवसांत ४० तास काम करावे लागेल. कामगारांनी चार दिवसांचा कामाचा आठवडा मिळविला, तर शिक्षकही तशी मागणी करू लागतील आणि आपल्या मुला-मुलींना सुट्टीच्या काळात कसे गुंतवून ठेवावयाचे, असा प्रश्न पालकांच्या पुढे उभा राहील.

———

### " कर्जे लवकर मिळविण्यासाठी लाच देऊ नका "

काही सरकारी खात्यांत कामे लवकर करून घेण्यासाठी कर्मचाऱ्यांना लाच दिली जाते. बँकांच्या कर्मचाऱ्यांना तशी लालूच न दाखविण्याचे आवाहन युनायटेड कमर्शिअल बँकेचे कस्टोडिअन श्री. आर. बी. शहा ह्यांनी व्यापारी व उद्योगपती ह्यांना केले आहे. कामे करून घेण्यासाठी 'चांदीची पेपरवेटस्' न वापरण्याचा त्यांनी सल्ला दिला आहे. तुम्ही लहान लाच द्याल तर दुसरा त्याहून मोठी लाच देईल आणि त्याला प्राधान्य मिळेल असा त्यांनी इशारा दिला. लाचलुचपतीस आळा घालण्यासाठी त्यांनी लोकांच्या सहकार्याची मागणी केली.


**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : **659–60, Raviwar Peth, Belgaum**

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital &**
**Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** *General Manager.*

**K. B. KIRTIKAR** *Chairman.*




**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
**MADHAVNAGAR (S. Rly.)**
Phone: 318 Sangli
Gram: 'SEWA Madhavnagar

# सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेलस् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI



**इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.**

कारखानदार—

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२

तार : Vijayplow


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )